महाराष्ट्र जिल्हा दर्शनिका संपादक मंडळ,(पुनरावृत्ती) पुनर्रचना करणेबाबत...

महाराष्ट्र शासन
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग,
शासन निर्णय, क्रमांक: दर्शनि-२०१८/ प्र.क्र.१३७/सांका.-२.
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ११ सप्टेंबर, २०१९.

वाचा : १. शासन निर्णय, क्रमांक: दर्शनि-२०१८/ प्र.क्र.१३७/सांका.-२, दि.१९ नोव्हेंबर, २०१८.
२. कार्यकारी संपादक व सचिव, दर्शनिका विभाग यांचे पत्र क्र. दर्श-९३७, दिनांक २३ ऑगस्ट, २०१९ चे पत्र.

प्रस्तावना :-

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या संदर्भ क्रमांक १ येथील दि.१९.११.२०१९ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र जिल्हा दर्शनिका संपादक मंडळाची पुनर्रचना करण्यात आली होती. या संपादक मंडळाची मुदत उक्त शासन निर्णयाच्या दिनांकापासून ३ वर्षे किंवा शासनाचे पुढील आदेश होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत होती. सदर संपादक मंडळामध्ये नाशिक आणि नंदूरबार जिल्ह्यासाठी स्विकृत संपादक सदस्य नियुक्त करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन होता.

शासन निर्णय:-

दर्शनिका विभागांतर्गत असलेल्या महाराष्ट्र जिल्हा दर्शनिका संपादक मंडळावर नाशिक जिल्हा गॅझेटिरसाठी श्री. गिरीश टकले तर नंदूरबार जिल्हा गॅझेटिअरसाठी प्रा.डॉ. सर्जेराव भामरे यांची स्विकृत सदस्य म्हणून नियुक्ती करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. या संपादक मंडळाच्या अशासकीय सदस्यांना अनुज्ञेय असलेला प्रवासभत्ता, दैनिकभत्ता शासन निर्णय, वित्त विभाग क्र.प्रवास-१०१०/ प्र.क्र. २/ सेवा-५, दिनांक ३.३.२०१० व बैठकभत्ता शासन निर्णय, वित्त विभाग,क्र.बैठक-२०१२/ प्र.क्र. १/ सेवा-५, दिनांक २४.५.२०१२ अन्वये मंजूर करण्यात यावा. मात्र या अशासकीय सदस्यांना विमान प्रवास आणि रेल्वेच्या वातानुकूलीत प्रथम वर्गाचा प्रवास अनुज्ञेय असणार नाही. प्रवासभत्ता, दैनिकभत्ता व बैठकभत्ता यामध्ये शासन वेळोवेळी जे बदल करेल ते या संपादक मंडळाच्या अशासकीय सदस्यांना लागू राहतील.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०९१११८०६३५१२२३ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by Sawant Balasaheb Ishwar
Date: 2019.09.16 12:48:45 +05'30'

(बाळासाहेब ईश्वर सावंत)
कार्यासन अधिकारी,महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. मा.मंत्री (सांस्कृतिक कार्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. सचिव, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय,मुंबई.
३. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४. कार्यकारी संपादक व चसचिव, दर्शनिका विभाग, मुंबई.

५. मंडळाचे सर्व सदस्य व स्विकृत सदस्य (कार्यकारी संपादक व सचिव, दर्शनिका विभाग, मुंबई यांचे मार्फत)
६. महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता),मुंबई.
७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
८. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुबई.
९. वित्त विभाग (व्यय-१४/सेवा-५) मंत्रालय,मुंबई.
१०.निवड नस्ती, सां.का.२.